# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**ब-क्षेत्रिय कार्यालय, एल्प्रो कंपनी परिसर, लिंक रोड, चिंचवडगांव, पुणे-३३.**

**(नागरी व प्रशासकीय सेवेसाठी आयएसओ 9001:2008 प्रमाणपत्र प्राप्त संस्था)**

**Email – bward@pcmcindia.gov.in Website – www.pcmcindia.gov.in**

**दुरध्वनी क्रमांक – ०२०-२७३५०१५३**

---

जावक क्र.-बक्षे/सभाशाखा/२/कावि/ ८३ /२०२१ दिनांक २०/०७/२०२१

प्रति,
मा. श्री./श्रीमती-------------------------------------,
प्रभाग क्र.------------------------------------------,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

विषय : ब प्रभाग समितीची मासिक सभा दि. ३/८/२०२१
रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दि. ३/०८/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता ब क्षेत्रीय कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये अवर सचिव महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना २०२० /प्र.क्र./७६/नवि - १४, दिनांक २८ जून, २०२१ चे पत्रान्वये सुचित केलेप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने व्हिडीओ कॉन्फरन्सींगव्दारे आयोजित करणेत आली आहे. या पत्रासोबत सभेची कार्यपत्रिका पाठविण्यात येत आहे. तरी प्रस्तुत सभेस आपण ऑनलाईन पध्दतीने (Video Conferencing ) उपस्थित रहावे, हि विनंती.

कळावे,

आपली विश्वासू

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ब प्रभाग समिती

प्रत : सर्व संबंधित शाखा प्रमुख.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
ब प्रभाग समिती सभा
कार्यपत्रिका क्र. ८

दिनांक : ०३/०८/२०२१ वेळ : सकाळी ११.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दिनांक ३/०८/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता ब क्षेत्रीय कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये ऑनलाईन पध्दतीने व्हिडीओ कॉन्फरन्सींगव्दारे आयोजित केली आहे. सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

दिनांक ६/०७/२०२१ रोजीचा (कार्यपत्रिका क्र.७) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक १)मा.करूणा चिंचवडे यांचे दिनांक २९/०६/२०२१ चे पत्रानुसार प्रभाग क्र.१७ मधील चिंचवड ते रावेत या मार्गावर ३४.५० मीटर या रस्त्याचे काम सध्या पुर्णत्वाकडे असुन वाल्हेकरवाडी आणि रावेतला जोडणारा वाल्हेकरवाडी सीमेवरील पुलास राजमाता जिजाऊ ब्रिज व वाल्हेकरवाडी व रावेत चौक यांना जोडणा-या रस्त्याला राजमाता जिजाऊ मार्ग असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक २) मा.नामदेव ढाके यांचे दिनांक ०६/०७/२०२१ चे पत्रानुसार मौजे चिंचवड वाल्हेकरवाडी येथील सर्वे नं.८० पै व ८३ पैकीची जागा मधुन स्वामी विवेकानंद सोसायटी मध्ये राहणारे नागरिक व रहिवाशी यांना रस्त्याची अत्यंत गरज आहे. सद्यस्थीत सर्व रहिवाशी नागरिकांना जाणे येणेसाठी नॉन डीपी ९ मी.रस्ता, महाराष्ट्र अधिनियम कलम २०५ अन्वये बाधित शेतक-यांना प्रचलित पध्दतीने मोबदला देऊन रस्ता घोषीत करणेस तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम २०५ अन्वये नॉन डी पी बाधित जमीन धारकास पचलित पध्दतीने मोबदला देऊन रस्ता घोषीत करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

मा.सभापती यांचे मान्यतेने ऐनवेळचे विषय घेणेत येतील.

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ब प्रभाग समिती

क्र.-बक्षे/सभाशाखा/२/कावि/८३/२०२१
दिनाक - २०/ ०७ /२०२१